**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीसाठी बच्चू कडू आणि नीलम गोऱ्हे यांना शिवसेनेची उमेदवारी जाहीर, राष्ट्रवादीचे झीशान सिद्दिकींसह भाजपाच्या ६ उमेदवारांचे अर्ज दाखल

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी ९२ पूर्णांक ४७ शतांश टक्के इतकं विक्रमी मतदान

- भारत कोणत्याही प्रकारचं दहशतवादी कृत्य सहन करणार नाही, असा सष्ट संदेश ऑपरेशन सिंदूरमधून संपूर्ण जगाला गेल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन

- अमेरिकन सैन्याने इराणच्या आसपास ४२ जहाजांचा मार्ग रोखला

  आणि

- झारखंडमध्ये, पश्चिम सिंहभूम जवळ सारंडा जंगलात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत, एक माओवादी ठार

**<><><><><>**

महाराष्ट्रात राज्य विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीतल्या ९ आणि पोटनिवडणुकीतल्या एक अशा दहा जागांसाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. भाजपानं द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी दिलेल्या सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. प्रज्ञा सातव यांनीही आज भाजपाकडून पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरला. काँग्रेसच्या आमदार म्हणून त्यांनी राजीनामा दिल्यानं ही जागा रिकामी झाली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसनं माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना विधानपरिषदेवर संधी दिली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी आज अर्ज भरला.

शिवसेनेनं प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यापूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. प्रहार ही सामाजिक संघटना म्हणून कार्यरत राहणार असल्याचं बच्चू कडू यांनी यावेळी स्पष्ट केलं.

शिवसेनेनं विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पुन्हा संधी देण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा शिंदे यांनी यावेळी वार्ताहरांशी बोलताना केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विधान परिषदेतले माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पुन्हा संधी दिली आहे. यावर नाराजी व्यक्त करत काँग्रेसनं उमेदवार देण्याची तयारी दर्शवली होती. त्यामुळं काँग्रेस नेत्यांचं मन वळवण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या वतीनं खासदार अनिल देसाई, आमदार अनिल परब आणि मिलिंद नार्वेकर यांच्यासह अंबादास दानवे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधीमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील यांची मुंबईत गांधी भवनात भेट घेतली.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात काल ९१ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान झालं. दोन्ही टप्प्यात मिळून पश्चिम बंगालमधे यावेळी ९२ पूर्णांक ४७ शतांश टक्के अशी विक्रमी मतदानाची नोंद झाली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी, निवडणूक आयुक्त डॉ. एस.एस. संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्यासह, मतदानाचं बारकाईने 'लाईव्ह वेबकास्टिंग'द्वारे निरीक्षण केलं.

पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरी मधे झालेल्या विधानसभा निवडणुकांची मतमोजणी येत्या ४ मे रोजी होणार आहे.

कर्नाटकमधे बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण, नागालँडमधे कोरिडांग, त्रिपुरामधे धर्मनगर, महाराष्ट्रात बारामती आणि राहुरी, तसेच गुजरातमधे उमरेठ या विधानसभा मतदारसंघांमधे झालेल्या पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ तारखेला होणार आहे.

विविध संस्थांनी मतदानोत्तर कल चाचण्यांचे अंदाज प्रसिद्ध केले आहेत. आसाममध्ये भाजपा, तर केरळमध्ये, काँग्रेस सत्तेवर येण्याची शक्यता त्यात वर्तवली आहे. तामिळनाडूमध्ये बहुतांश एक्झिट पोल्सच्या अंदाजानुसार द्रमुक आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल.

पश्चिम बंगालमध्ये, काही चाचण्यांमधे भाजपचा विजय होईल असा अंदाज आहे, तर तृणमूल काँग्रेसला जास्त जागा मिळतील असा काही चाचण्यांचा अंदाज आहे.

**<><><><><>**

भारत कोणत्याही प्रकारचं दहशतवादी कृत्य सहन करणार नाही, असा सष्ट संदेश ऑपरेश सिंदूरमधून संपूर्ण जगाला दिला आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित केलेल्या  राष्ट्रीय सुरक्षा परिषद 2.0 मध्ये ते बोलत होते. भारतात आधी दहशतवादी हल्ले झाले तेव्हा केवळ राजकीय वक्तव्य करून त्याचा निषेध झाला. परंतु आता दहशतवादी हल्ल्यांबाबत भारताची भूमिका बदलली असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड राजनाथ बाईट**

दहशतवाद आणि त्याचे आश्रयदाते यांच्यात कोणताही भेद न करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाचा त्यांनी पुनरुच्चार केला. भारत हे माहिती तंत्रज्ञानाचं केंद्र आहे तर पाकिस्तान हे दहशतवादाचं केंद्र आहे, असं ते म्हणाले.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान हे आता भारतीय संरक्षण दलाचा अविभाज्य घटक असून नव्या जागतिक व्यवस्थेत एआय ही देशाच्या धोरणात्मक तयारीसाठी अत्यावश्यक बाब असल्याचं संरक्षणमंत्र्यांनी सांगितलं. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये  भारताच्या संरक्षण निर्यातीत विक्रमी वाढ झाली असून ती गेल्या वर्षीच्या तुलनेत ६२ टक्क्यांहून अधिक आहे. यात आणखी वाढ व्हावी, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचंही संरक्षणमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

श्रीनगर - जम्मू या विस्तारित वंदे भारत एक्सप्रेसला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी जम्मू तवी रेल्वे स्थानकावरून आज हिरवा झेंडा दाखवला. ही गाडी आधी श्रीनगरहून श्री माता वैष्णो देवी कत्रा पर्यंत धावायची, ती आता जम्मू तवी स्थानकापर्यंत धावेल. गाडीच्या डब्यांची संख्याही आठवरून वीस करण्यात आली असून जम्मू काश्मिरमधल्या वातावरणाला अनुसरून तिची रचना करण्यात  आली आहे. प्रवाशांची मागणी लक्षात  घेऊन वंदे भारत ट्रेनच्या डब्यांची संख्या वाढवण्यात आली  आहे, गेल्या बारा वर्षात रेल्वे क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झालं आहे, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले. जून २०२५  मधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थिती या गाडीचं उद्घाटन झालं होतं, तेव्हापासून साडे पाच लाख प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेतल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

या मार्गावरल्या सेवेला येत्या शनिवारपासून सुरुवात होईल. यावेळी केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह आणि जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला उपस्थित होते.

**<><><><>**

अमेरिकन सैन्याने इराणच्या आसपास ४२ जहाजांचा मार्ग रोखला असल्याची माहिती अमेरिकेचे सेना दल प्रमुख ब्रॅड कूपर यांनी आज समाजमाध्यमांवर दिली. इराणच्या किनाऱ्यावरुन बाहेर पडणाऱ्या, किंवा इराणच्या बंदरांमधे जाणाऱ्या जहाजांचा त्यात समावेश आहे. त्यात ४१ तेल टँकर्स असून त्यावर सुमारे ६ कोटी ९० लाख बॅरल तेल भरलेलं आहे. इराणची नाकेबंदी यशस्वी झाल्याचा दावा अमेरिकेनं केला आहे. इराणने या प्रकाराचा कठोर निषेध केला असून ही निव्वळ चांचेगिरी असल्याचा आरोप केला आहे. कर्मचारी आणि त्यांची कुटुंब असलेलं कोणतंही जहाज इराणने आजवर रोखलं नाही असं त्यांच्या सैन्यदलानं म्हटलं आहे. अमेरिकेच्या या कृतीला सडेतोड उत्तर देण्याचा इशाराही इराणने दिला आहे.

<><><><><>

महिला आरक्षण विधेयकावर चर्चा करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनं विधानसभेचं आज एक दिवसाचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरू आहे.

सभागृहाचं कामकाज सुरू झालं तेव्हा संसदीय कामकाजमंत्री सुरेश खन्ना यांनी महिला आरक्षण विधेयकावर नियम ३०१ अंतर्गत सभागृहात चर्चेचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर या चर्चेला सुरूवात झाली.

<><><><><>

बलात्कारामुळे गर्भधारणा झाल्यास पीडितेच्या गर्भपातासाठी कोणतीही कालमर्यादा नसावी, असं सर्वोच्च न्यायालयानं आज स्पष्ट केलं. केंद्र सरकारनं कायद्यात आवश्यक सुधारणा करून बलात्कार पीडितांना २० आठवड्यांनंतरही गर्भपाताची परवानगी देण्याबाबत विचार करावा, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांच्या पीठासमोर १५ वर्षीय पीडितेच्या ३० आठवड्यांच्या गर्भपाताबाबत सुनावणी झाली.

<><><><><>

उत्तरप्रदेशात पिलभीत इथं बासमती आणि सेंद्रीय शेती प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी उत्तप्रदेश सरकारच्या कृषी विभागाने ॲपेडा अर्थात कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाबरोबर ७० वर्षांचा भाडे करार केला आहे. देशात बासमती तांदळाची परिसंस्था बळकट करणं हा या कराराचा हेतू आहे.

<><><><><>

झारखंडमध्ये, पश्चिम सिंहभूमजवळ सारंडा जंगलात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत, एक माओवादी ठार झाला. ठार झालेला 'इस्त्रायल पुर्ती' या माओवादयावर १ लाख रुपयांचं बक्षीस होतं. 'कोब्रा 209 बटालियनसह सुरक्षा दलांची संयुक्त मोहीम गेल्या दोन दिवसांपासून रुतुगुटू, तुनबेदा आणि बोरोई या भागात सुरु होती.

<><><><><>

देशाच्या अनेक भागात उन्हाळा तीव्र होत असतानाच  अनेक ठिकाणी आज आणि उद्या मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. हिमाचल प्रदेशात बहुतांश ठिकाणी, तसंच पश्चिम बंगालमधलं हिमालयीन क्षेत्र, बिहार, झारखंड, ओदिशा, दिल्लीचा काही भाग, हरयाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात अनेक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे.

//<><><><><>//